CHIEF JUDICIAL MAGISTRATE WARDHA

## कोर्ट विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, कोर्ट नं. १, वर्धा.

आर.सी.सी.नं.:४३९/२०२६
अपराध क्र.:२६८/२०२६

**अर्जदार/सुप्रतदार** : **सौ. लक्ष्मी रमेश जाधव,**
वय—३८ वर्षे, कामधंदा—रोजमजुरी,
रा. वार्ड नं. ५, तिगांव, पो. दहेगांव,
त. जि. वर्धा.

**विरूध्द**

**गैरअर्जदार** : **महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, सावंगी(मेघे), वर्धा, त. जि. वर्धा.**

**अर्ज** : **भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे (बी.एन.एस.एस) चे कलम ५०३ व भारतीय न्याय संहितेचे २०२३ चे कलम ३(५), ३०४(२) प्रमाणे अपराध क्र. २६८/२०२६ मध्ये जप्त असलेले दुचाकी वाहन क्र. M.H.-32 AZ-3363 होंडा मोटार सायकल अॅन्ड स्कूटर इंडिया प्रायवेट लिमिटेड कंपनी, जिचा मॉडेल (SP 125 DLX DISK), अर्जदारास सुप्रतनाम्यावर मिळण्याबाबत.**

ORDER

Call say of I.O. and Ld. APP, returnable on next date.

Sd/-
JMFC
18/06/2026

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.06.18 16:36:58 +0530

अर्जदाराचा विनंती अर्ज येणेप्रमाणे :—

१. अर्जदार ही वार्ड नं. ५, तिगांव, पो. दहेगांव, त. जि. वर्धा येथील रहिवासी असून व्यवसायाने रोजमजुरीचे काम करते. अर्जदार यांनी त्यांच्या दैनंदिन गरजेकरिता होंडा मोटार सायकल अॅन्ड स्कूटर इंडिया प्रायवेट लिमिटेड कंपनी, जिचा मॉडेल (**SP 125 DLX DISK**) दुचाकी वाहन विकत घेतलेले होते.

२. अर्जदार सदर वाहनाचा खरेदीदार असून सदर वाहन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वर्धा येथून नोंदणीकृत केले आहे. आज स्थितीत अर्जदार सदर वाहनाचा मालक आहे. सदर वाहन हे अर्जदाराचा मुलगा काही कामानिमित्य घराबाहेर घेऊन गेला असता त्याने सदरचे वाहन

त्याच्या मित्राला काही कामानिमित्य दिलेले होते. त्यानंतर सदरचे वाहन सदरच्या केसमध्ये आरोपीकडून कसे काय जप्त केले, ही बाब अर्जदाराला माहित नाही. परंतु सदरच्या गुन्हयाशी अर्जदाराचा कोणताही संबंध नाही. तसेच अर्जदाराने सदरचे वाहन कोणत्याही गुन्हयात वापरण्याकरिता दिलेले नव्हते. अर्जदार व सदर गुन्हयातील आरोपी एकमेकांना ओळखत सुध्दा नाही त्यामुळे सदरचे वाहन अर्जदाराला विद्यमान कोर्टाने सुप्रतनाम्यावर देण्याची कृपा करावी.

३. सदर वाहन गैरअर्जदार यांनी सदर गुन्हयात जप्त केले आहे. सदर वाहन गैरअर्जदार यांनी अपराध क्र. २६८/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) अन्वये जप्त केले आहे. वास्तविकता सदर गुन्हयाशी अर्जदार यांच्या मालकीच्या वाहनाचा कोणताही संबंध नाही. सदरचे वाहन हे आरोपीजवळ मिळाल्यामुळे गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्या मालकीचे वाहन सदर गुन्हयात जप्त केलेले आहे.

४. सदर प्रकरणात गुन्हयाचा तपास पुर्ण झालेला आहे तसेच दोषारोप पत्र सुध्दा विद्यमान न्यायालयात दाखल झालेले आहे. गैरअर्जदार यांना सदर वाहनाच्या ताब्याची कोणतीही आवश्यकता उरलेली नाही. याउलट अर्जदार हिला रोजमजुरीच्या कामाकरिता तसेच कामावर जाणे–येणेकरिता सदर वाहनाची अतिशय आवश्यकता भासते तसेच या वाहनावरच अर्जदाराचे उत्पन्न अवलंबून आहे. सदर वाहन हे गैरअर्जदार यांच्या ताब्यात असल्यामुळे अर्जदाराला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अर्जदाराचे सदर वाहन पोलिस स्टेशन सावंगी(मेघे) च्या खुल्या प्रागणांत उभी ठेवल्यामुळे ऊन, वारा, पाऊस इत्यादी कारणामुळे गाडीचे महत्वाचे भागास इजा पोहचून इंजिन व चेसीस निकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे अर्जदाराचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर वाहनाचे वर्णन येणेप्रमाणे.

१) रजिस्ट्रेशन नं. **M.H.-32 AZ-3363**, २) इंजिन क्र. **JC94EG3197918**, ३) चेसीस क्र. **ME4JC94ECSG114381**, **PEARL IGNEOUS BLACK** रंगाची आहे.

५. सदर गुन्हयातील नमुद वाहन अर्जदाराला सुप्रतनाम्यावर दिल्यानंतर अर्जदार सदर वाहनाचे मुळ स्वरूपात कोणत्याही प्रकारचा बदल करणार नाही. तसेच तिसऱ्या व्यक्तीच्या हक्क निर्माण होईल असा कोणताही व्यवहार करणार नाही. गहाण, बक्षीस किंवा अन्य तऱ्हेचा लेखाने विल्हेवाट करणार नाही. अर्जदार विद्यमान कोर्टाने लादून दिलेल्या सर्व अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करेल, यात कसुर करणार नाही.

६. अर्जदार सदर आदेशाचे काळजीपुर्वक पालन करेल, यात कोणतीही हयगय करणार नाही. अर्जदाराने यापुर्वी सदर वाहन सुप्रतनाम्यावर मिळण्याकरिता कोणत्याही कोर्टात अर्ज सादर केला नाही. अर्जदार हा विद्यमान न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येत असल्यामुळे अर्जदाराचे सदर अर्जावर आदेश पारित करण्याचा विद्यमान न्यायालयास पुरेपूर अधिकार आहे.

७. अर्जदाराने सदर अर्जासोबत काही महत्वाचे दस्ताऐवज दाखल केलेले आहे तसेच योग्य वेळी आवश्यक ते दस्ताऐवज दाखल करण्याची ऐतव्दारे परवानगी मागत आहे.

करिता अर्जदाराचे नमुद वाहन सुप्रुर्तनाम्यावर सोडण्याचा आदेश पारित करणे न्यायहितार्थ आहे. करिता अर्जदाराचा सदर अर्ज.

**प्रार्थना** :— करिता विद्यमान कोर्टास नम्र विनंती आहे की, अपराध क्र. २६८/२०२६ मध्ये जप्त असलेली होनमी होंडा मोटार सायकल ॲन्ड स्कूटर इंडिया प्रायवेट लिमिटेड कंपनी, जिचा मॉडेल (**SP 125 DLX DISK**) दुचाकी वाहन अर्जदारास सुप्रतनाम्यावर देण्याचा आदेश पारीत करण्यात यावा.

वर्धा

दिनांक:१७/०६/२०२६

अर्जदाराची सही

अर्जदारातर्फे वकील

<u>सत्यापन</u>

मी **सौ. लक्ष्मी रमेश जाधव,** वय—३७ वर्षे, कामधंदा—रोजमजुरी, रा. वार्ड नं. ५, तिगांव, पो. दहेगांव, त. जि. वर्धा, सदर अर्जातील परिच्छेद क्र. १ ते ६ मध्ये नमुद केलेला संपुर्ण मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला असून तो मला वाचून दाखविला. तो खरा व सत्य असल्याबाबत यावर सही केली आहे.

लक्ष्मी

वर्धा
दिनांक:१७/०6/२०२६

शपथपत्र करणार/सुप्रतदार

मी शपथपत्र करणार यांना ओळखतो.
त्याने माझ्यासमक्ष सही केली.

**(ॲड. एस.डी. सोनोने, वर्धा)**

Solemnly affirmed before me
on this 17 th day June 2026
by Smt. Laxmi w/o Ramesh Jadhav
aged 37 yrs
R/o Tigaon
Post. Dahegaon
T/D Wardha.
who is identified before me by
Shri S. D. Sonone Adv. of Wardha
personally known.

170626
Asstt. Supdt
Court of C.J.M. Wardha
17 JUN 2026

CHIEF JUDICIAL MAGISTRATE WARDHA

लक्ष्मी